# चैतन्य लहरी

सप्टेंबर/ऑक्टोबर २००५
अंक क्रमांक ९/१०



# दिवाळी लक्ष्मीपूजन २००५, प्रतिष्ठान, पुणे













# अनुक्रमणिका


- दिवाळी धनत्रयोदशी पूजा प्रतिष्ठान, पुणे-वृत्तांत ........ २
- लक्ष्मीपूजन प्रतिष्ठान, पुणे-वृत्तांत ........ २
- नवरात्री पूजा-वृत्तांत ........ ३
- श्रीसूक्त ........ ६
- सर सी.पी.श्रीवास्तवसाहेब, भाषण दि. १५ ऑक्टोबर २००५ ........ ८
- श्रीमाताजींचे भारत आगमन ........ ९
- श्रीमाताजींचे पुणे आगमन ........ ९
- श्रीकृष्ण पूजा, न्यू जर्सी-अमेरिका- वृत्तांत ........ १०
- राष्ट्रपती भवन न्यु दिल्ली, वृत्तांत ........ ११
- लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय पारितोषिक: स्वीकृति भाषण, १ ऑक्टोबर २००५ ........ ११
  सी. पी. श्रीवास्तव (आय. ए. एस. निवृत्त)
- आदिशक्ति महाभैरवी विरचित ........ १३
  ॥ श्री कुण्डलिनीस्तुतिस्तोत्र ॥ ........


## ख्रिसमस पूजा - दिनांक २४, २५ व २६ डिसेंबर २००५, पुणे

सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, दिनांक १६ एप्रिल २००४ पासून सहजयोगातील कॅसेट, सी.डी. पुस्तके, मासिके, श्रीमाताजींचे फोटो, कॅलेंडर, चैतन्य लहरी व युवादृष्टी मासिके, श्रीमाताजींची पेंडॉल्स, इ. साहित्य भारतभरातील वितरण व विक्री व्यवस्था ''निर्मल इंन्फोसिस्टीम ॲण्ड टेक्नॉलॉजि प्रा. लि पुणें'' या कंपनी मार्फत होत आहे. तरी सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की ,निर्मल इंन्फोसिस्टीमस ॲण्ड टेक्नॉलॉजिस प्रा. लि.या कंपनीच्या लेखी परवानगी शिवाय वरील साहित्याची निर्मिती तसेच परस्पर विक्री कुणीही करु नये. तसे केल्यास त्याची जबाबदारी संबंधित सहजयोग्यावर व लीडरवर राहील. सदर कंपनीचा पत्रव्यवहाराचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे.

NIRMAL INFOSYSTEMS AND TECHNOLOGIES PVT. LTD.
BLDG. NO. 8, CHANDRAGUPT HSG. SOC.
PAUD ROAD, KOTHRUD,PUNE 411 O29. TEL. 020 25286537

# दिवाळी धनत्रयोदशी पूजा प्रतिष्ठान, पुणे

दिनांक ३० ऑक्टोबर २००५ रोजी प्रतिष्ठानच्या दालनात पूजा संपन्न झाली. त्यावेळी श्रीमाताजींच्या चरणावर श्री राजेंद्र पुगालिया यांनी गुलाब फुलांचा हार अर्पण केला. त्यानंतर श्रीमाताजींना साडी अर्पण केली. तसेच एका सुंदर चांदीच्या तबकात एका बाजूला श्रीमाताजींची प्रतिमा व दुसऱ्या बाजूला श्रीमाताजींचे चरण असलेल्या चांदीच्या मुद्रा अर्पण करण्यात आल्या. आज श्रीमाताजी अत्यंत प्रसन्न व आनंदी होत्या. त्यांच्या सोबत ती.पापाजी आणि साधनादीदी होत्या.

# लक्ष्मीपूजन प्रतिष्ठान, पुणे

## दिनांक १ नोव्हेंबर २००५

प्रतिष्ठानमधील हॉलमध्ये महाराष्ट्रातील सहजयोग्यांच्यावतीने श्रीमाताजींचे लक्ष्मीपूनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्रतिष्ठानमधील हॉलमध्ये श्रीमाताजींचे आसन मांडले होते. त्याच्या मागच्या बाजूला फुलांनी सजावट केलेली कमान उभारली होती. त्यावर विद्युतरोषणाई केली होती. श्रीमाताजी त्यांच्या शयनगृहातून साधारण ९.३० च्या सुमारास हॉलमध्ये आल्या. त्यांच्या सोबत ती.पापाजी, कल्पनादीदी, साधनादीदी व श्री. पी. के. श्रीवास्तवसाहेब होते.

त्यावेळी प्रथम स्वागत आगत स्वागत हे गीत झाले. त्यानंतर श्रीमाताजींच्या चरणावर पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर श्रीमाताजींच्या चरणावर सर्व सहजयोग्यांच्या वतीने श्री पुगालिया यांनी कमळांची फुले वाहून त्यांची चरणपूजा केली. त्यावेळी बिनती सुनिये आदिशक्ति मेरी, लक्ष्मी आली तिची कृपा आम्हावर झाली, महामाया महाकाली व शेवटी विश्ववंदिता ही भजने झाली.त्यानंतर श्रीमाताजींची आरती.

श्रीमाताजींना ओटी, सौ साधनादीदी व कल्पनादीदी यांनी भरली. त्यानंतर श्रीमाताजींना प्रसादाचा नैवेद्य दाखविण्यात आला. त्यावेळी कल्पनादीदी व साधनादीदीनी श्रीमाताजींना प्रसाद भरवला. त्यानंतर जगातील कलेक्टिव्हिटीच्या तर्फे श्रीमाताजींना एक कला-कुसर असलेला सुंदर टी पॉय प्रेझेंट केला.

त्यावेळी ती.पापाजींनी सर्वांना मार्गदर्शनपर भाषण केले. त्यामध्ये त्यांनी सांगितले की आपल्या माताजींनी जगात सत्याचा विजय व्हावा म्हणून जगभर सहजयोगाचा प्रसार करण्यासाठी संपूर्ण आयुष्यभर प्रवास केला. <u>सर्व जगातील लोकांनी धर्म, जात, लहान-मोठे, सर्वांनी एकत्र यावे अशी त्यांची इच्छा होती.</u> सर्वांनी सत्याच्या मार्गाने जावे असे त्यांना सतत वाटते. तरी सर्वांनी श्रीमाताजींनी वेळोवेळी सांगितल्याप्रमाणे वागावे. सर्वांना श्रीमाताजींच्या वतीने दिवाळीच्या शुभेच्छा.

त्यानंतर श्रीमाताजी आपल्या शयनगृहाकडे परतल्या. सदर पूजेसाठी मोजकेच सहजयोगी उपस्थित होते. पूजेनंतर सर्वांना प्रसाद वाटण्यात आला बाहेरच्या बाजूला फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली.संपूर्ण कार्यक्रम साधारण तासभर चालला होता.

# नवरात्री पूजा -वृत्तांत

दिनांक १४,१५,१६, ऑक्टोबर २००५, गुडगांव, न्यू दिल्ली

दिल्ली व हरियाणाच्या सीमेवर गुडगांव हे हरियाणा राज्यातील शहर आहे. गुडगांव मध्ये ताऊ देवीलाल स्टेडियम नावाने मोठे स्टेडियम आहे. स्टेडियममध्ये प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींची नवरात्रीची पूजा आयोजित केली होती. अनेक वर्षांनी नवरात्रीची पूजा भारतात होत असल्याने सर्वत्र मोठा उत्साह जाणवत होता. स्टेडियमच्या मैदानात रोजच्या संध्याकाळच्या कार्यक्रमाचे तसेच पूजेचे आयोजन केले होते. तसेच सकाळचे मेडिटेशन व दिवसभरातील कार्यक्रमासाठी स्टेडियमच्या आवारात स्वतंत्र मंडप घालून व्यवस्था केली होती.

१४, ऑक्टोबर २००५

सकाळी ६.०० ते ६.३० या वेळात मेडिटेशन हॉलमध्ये ध्यानाची सुरुवात तीन महामंत्रांनी झाली त्यानंतर श्रीमाताजींची १९९७ सालची नवरात्रीची कॅसेट लावण्यात आली. त्यानंतर सकाळी १०.३० वा. श्री आर. के. पाल यांनी सहजयोगाबाबत सर्व सविस्तर माहिती दिली.

साधारण ११.३० वा सकाळचे सत्र संपले. त्यानंतर दुपारी ३.३० ते ५.३० या वेळात डॉ राय यांनी मेडिकल ट्रिटमेंटबाबत सविस्तर माहिती दिली.

संध्याकाळी ६.४५ च्या सुमारास मुख्य स्टेडियममध्ये कार्यक्रमाची सुरुवात झाली. स्टेजच्या मागच्या बाजूला भव्य पडद्यावर प.पू.श्रीमाताजींच्या फुलाच्या पाकळ्यामध्ये असलेल्या चेहऱ्याचे डेकोरेशन सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. त्याच्या बाजूला सर्वत्र फुलांची आरास केली होती. स्टेडियममध्ये एकूण ४ ठिकाणी स्क्रिन लावण्यात आले होते. स्टेडियमच्या बाजूनी सर्वत्र विद्युत रोषणाई केली होती. नवदुर्गादेवी रूपे असलेली विद्युत रोषणाई अत्यंत लक्षवेधी होती.

कार्यक्रमाची सुरुवातीला दिल्ली युवाशक्तीने नमामी श्री गणराज दयाळा,तेरे चरण कमलमे रहनेवालो या भजनाने केली. त्यानंतर उज्वला या १० वर्षाच्या मुलाने, अन्यथा शरणं नास्ती हे भजन म्हटले. त्यानंतर प्रसिद्ध गिटार वादक रुस्तम सरकार यांनी राग रागेश्वरी वाजवला त्यांना संदेश पोपटकर यांनी साथ दिली. त्यानंतर ३ वर्षाच्या मुलीने नृत्य करुन सर्वांची वाहवा मिळविली. गोरखपूरच्या ग्रुपने, मैया तेरे द्वारे, मैया है मैया, हे निर्मल मैया पुरी करो आस हमारी ही भजने सादर केली.

निर्मल संगीत सरीताने बाबा मामांनी लिहिलेल्या जुन्या भजनांचे एक एक कडवे म्हटले, त्यात माँ तेरे निर्मल प्रेम को , आया हू दरबार तुम्हारे, लहरला सहजाचा पताका लहरला, सहजबिना कोई न उतरा पार, ब्रह्म शोधिले बह्मांड मिळाले, तेरे चरण कमलमे रहने वालो, माऊलीने ठोठावले दार, प्यार भरे ये दो निर्मल नैन, मुझरिम कातिल हो गया, निर्मला किती वर्णावी तुझी ग स्तुती ही भजने म्हटली. यानंतर सितारवादक श्री अवी शिवलीकर यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी राग यमन वाजवला त्यांना तबल्याला साथ संदेश पोपटकर यांनी दिली.आंध्र प्रदेशच्या मुंजुशाने कुचीपुडी नृत्य सादर केले त्यामध्ये पायाखाली थाळी घेऊन, हातात पेटते दिवे घेऊन, डोक्यावर अनेक घडे घेऊन नृत्याचे प्रकार सादर केले.

प्रसिद्ध गायक पंडित उल्हास कसळकर यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी सुरुवातीला राग सादर करून त्यानंतर रामकृपा, देखू मुरारी, जोहार मायबाप, ही भजने सादर केली. त्यानंतर साधारण मध्यरात्रीच्या सुमारास प्रसिद्ध बासरीवादक पंडित राजेंद्र प्रसन्ना यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी राग गोरख कल्याण व शेवटी राग पहाडी वाजवला. त्यानंतर स्क्रीनवर श्रीमाताजींच्या घरी नुकत्याच तासभर झालेल्या भजनाच्या कार्यक्रमाचे व्हि.डि.ओ. रेकॉर्डिंग दाखविण्यात आले.त्यामध्ये सर्वांना श्रीमाताजींचे स्क्रीनवर दर्शन झाल्याने सर्वजण आनंदी झाले.

१५ आक्टोबर २००५

आजच्या दिवसाची सुरुवात सकाळच्या ६.०० ते ६.३० च्या ध्यानाने झाली. त्यानंतरच्या १०.३० च्या सत्रामध्ये सुरवातीला डॉ राय यांनी मेडिकल ट्रिटमेंटबाबत माहिती दिली.श्री राजीव कुमार यांनी सांगितले की आता सर्व ट्रस्ट रद्द करण्यात आले असून प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवी हा एकमेव ट्रस्ट झालेला असल्याची माहिती दिली. तसेच सदर ट्रस्टच्या माध्यमातून नुकतेच छिंदवाडा येथील श्रीमाताजींचे जन्मठिकाण असलेली जागा ट्रस्टने खरेदी केली असून त्याठिकाणी सहजयोग्यांना जाऊन राहता येण्यासाठी मोठी इमारत बांधण्याचे काम लवकरच सुरू करीत असल्याचे सांगितले. श्री तिवारी, कपूर तसेच श्री गौतम यांनी कायदेशीर बाबींची माहिती दिली.दुपारी ३.३० च्या सत्रात डॉ उदवाणी यांनी सहजयोग प्रसार व प्रचार याबाबत सर्वांना मार्गदर्शन केले.

मुख्य स्टेडियममध्ये स्टेजच्या मागच्या बाजूला श्रीमाताजींच्या पालमविहारच्या घराची भव्य प्रतिकृती दाखविली होती. कार्यक्रमाची सुरूवात एन.जी.ओ. ग्रुपच्या भजनाने झाली. त्यानंतर त्यांनी ममतामयी माँ दुर्गासी लागे या भजनावर नृत्य सादर केले. त्यानंतर दिल्ली युवाशक्तीने नृत्य नाटिका सादर करताना त्यात पुराणातील गणेश, श्रीकृष्णाचे कार्य, आदिशक्तीचे अवतरण, सहजयोगाचे कार्य हे सर्व सादर करीत सर्वांना मंत्र मुग्ध केले. त्यानंतर दिल्लीच्या अन्नपूर्णाने व्हायलिनवर राग हंसध्वनी सादर केला तसेच ब्रह्म शोधिले ब्रह्मांड मिळाले हे भजन सादर केले.

त्यानंतर स्क्रिनवर ती.पापाजींना १ ऑक्टोबर २००५ रोजी राष्ट्रपतींच्या हस्ते देण्यात आलेल्या कार्यक्रमाचे व्हि.डि.ओ. टेप दाखविण्यात आले. त्याचवेळी ती.पापाजींचे स्टेजवर आगमन झाले. त्यांचे स्वागत राजिवकुमार यांनी केले. त्यांनतर ती.पापाजींनी अतिशय सुंदर भाषण केले (अंकात स्वतंत्र दिलेले आहे.) साधारण ८.०० च्या सुमारास ती.पापाजी स्टेडियमधून परत गेले.

धरमशाळेच्या मुलांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी वो भारत देश है मेरा, ॐकार स्वरुप गणेशांचे, जय दुर्गे दुर्गति हारिणी, उदे उदे ग अंबाबाई, गोंधळ ह्या भजनांवर वेगवेगळे नृत्याचे प्रकार सादर करीत सर्वांची वाहवा मिळविली. त्यामध्ये लहान मुलांनी श्रीकृष्णाच्या बाललीला सादर करीत सर्वांना हसविले. शेवटी कव्वाली, आया तेरे दरपे दिवाना सादर करून कार्यक्रम संपविला.

त्यानंतर व्हायलिन वादक प्रवीण शिवलीकर यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी राग बिहारी वाजवला कार्यक्रम संपला तेव्हा रात्रीचे १०.०० वाजले होते. त्यानंतर श्री अरुण आपटे यांनी जय जय हो महिमा तेरी, हे प्रसिद्ध भजन सादर केले. त्यानंतर प्रसिद्ध संतुर वादक पंडित भजन सपोरी आणि सहकारी यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी राग नंदकंस व जोग सादर करताना सर्वांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाच्या शेवटी उत्तर प्रदेशचे प्रसिद्ध कव्वाल, वजाहत हुसेन खान यांचे स्टेजवर आगमन झाले.

त्यांनी कव्वाली गात सर्वांना नाचवले. त्यानंतर नुकतेच श्रीमाताजींच्या घरी झालेल्या तासभराच्या म्युझिक प्रोग्रामची व्ही.डि.ओ. कॅसेट दाखविणात आली. त्यामध्ये श्रीमाताजींच्या झालेल्या दर्शनाने सर्वजण आनंदी झाले होते.

१६ ऑक्टोबर २००५

आजच्या पूजेच्या दिवसाची सुरूवात सकाळच्या ६.०० ते ६.३० च्या ध्यानाने झाली.त्यामध्ये नवरात्री २००१ ची पूजा दाखविण्यात आली. त्यानंतरच्या १०.३० च्या सत्रात ट्रस्टी राजीवकुमार यांनी मार्गदर्शन केले. तसेच दुपारच्या ३.३० च्या सत्रात परत त्यांनी व श्री कपूर यांनी मार्गदर्शन केले.

संध्याकाळी मुख्य स्टेडियममध्ये स्टेजच्या मागच्याबाजूला श्रीमाताजींची अष्टभुजेचे रूप असलेली प्रतिमा साकार केली होती. साधारण ७.०० च्या सुमारास जय गणेश, जागो जगदंबे, नाम रखलो तु माँ का नाम ,तेरे चरणमे रहनेवाले, अर्पण ये तनमन, माताजी तुही भवानी, महामाया महाकाली जो शेरावाली ही भजने झाली. त्यानंतर स्क्रीनवर श्रीमाताजींची एक कॅसेट दाखविण्यात आली. त्यात श्रीमाताजी पेटी वाजवताना, गाताना, मुलांबरोबर असे अनेक छोटे छोटे प्रसंग दाखविण्यात आले होते.

साधारण ९.४५ च्या सुमारास श्रीमाताजींचे फटाक्यांच्या प्रचंड आतषबाजीत स्टेजवर आगमन झाले. त्यांच्यासोबत ती. पापाजी, साधनादीदी होत्या. पडदा बाजूला झाला आणि अत्यंत प्रसन्न, आनंदी, मोहक असे आदिशक्ती श्रीमाताजींचे सर्वांना दर्शन झाले. श्रीमाताजींना दोन सुवासिनींनी ओवाळले. त्यानंतर ट्रस्टी श्री राजेंद्र पुगालिया व श्री. दिनेश राय यांनी श्रीमाताजींना हार अर्पण केला. त्यानंतर अथर्वशीर्ष, बिनती सुनिये, हेमजा सुतम, म्हणत असताना श्रीमाताजींच्या चरणावर लहान मुलांनी फुले वाहून पूजा केली. पूजेनंतर महाप्रसादाचा नैवेद्य दाखविण्यात आला. त्यानंतर जगातील अनेक देशातून आलेले गिफ्ट श्रीमाताजींना अर्पण करण्याचा कार्यक्रम पार पडला. प्रत्येकाने आणलेले गिफ्ट श्रीमाताजी स्वत: शांतपणे पहात होत्या. मध्येच थोडेसे स्मितहास्य करत होत्या. श्रीमाताजींची तब्येत अत्यंत चांगली होती. त्या अत्यंत आनंदी, प्रसन्न होत्या त्यामुळे पूजा व गिफ्ट सादर करण्याचा कार्यक्रम शांतपणे साधारण तासभर चालू होता. त्यानंतर आदिशक्ती आपल्या निवासस्थानी साधारण ११.३० च्या सुमारास निघाल्या.

श्रीमाताजींच्या प्रसन्न व आनंदी रूपाच्या दर्शनाने सर्व जमलेले सहजयोगी भारावून गेले होते. त्यामुळे सर्व सहजयोग्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. सर्व सहजयोग्यांना प्रसाद वाटपासाठी अनेक काऊंटर तयार केले होते. त्यात राहणाऱ्या सहजयोग्यांसाठी जेवणाच्या हॉलमध्ये तर न रहाणाऱ्या सहजयोग्यांसाठी मेडिटेशन पेंडॉलमध्ये व्यवस्था केली होती.प्रत्येकाला खाकी रंगाच्या पिशवीत प्रसाद त्यात खास फूटाणे, कुंकू, व्हायब्रेटेड पाणी, पंचरंगी दोरा, तसेच छोले पुरी दिलेले होते. तसेच श्रीमाताजींचे अनेक फोटो असलेले पुस्तक, श्री पापाजींचा परिचय असलेली पुस्तिका देण्यात येत होती.

पूजेची तयारी साधारण १ महिन्यापासून सुरू होती. पूजेसाठी प्रत्येक तंबूत १०जण राहू शकतील असे ५०० तंबू मागविले होते. परदेशातील लोकांसाठी व भारतीयांसाठी स्वतंत्र जेवणाची व्यवस्था केलेली होती. इलेक्ट्रिकची वेगळ्या प्रकारची असलेली रोषणाई सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.आदिशक्ती श्रीमाताजींच्या प्रसन्न, आनंदी दर्शनाच्या लाभाने सर्व सहजयोगी परतीच्या वाटेकडे निघाले.

●●●



# श्रीसूक्त

पुत्र-पौत्रं धनं धान्यं हस्त्यश्वादि गवे रथम् ।
प्रजानां भवसि माता आयुष्मन्तं करोतु मे ॥४॥

विवरण :- हे लक्ष्मीमाते, आम्हाला पुत्र-पौत्र, धन-धान्य, हत्ती, अश्व, गोधन, रथ हे सर्व काही तूच देतेस. तू सर्व प्रजेची माता आहेस. म्हणजेच तू लोकमाता आहेस. हे देवी तू आम्हाला दीर्घायुषी कर अशी प्रार्थना ऋषी करत आहेत.

थोडक्यात म्हणजे, आम्हाला संतति-सौख्य, सर्व समृद्धी तूच देतेस. त्याचे पालन - पोषण-संवर्धन तूंच करतेस. हे माते तुझ्या कृपाशीर्वादाने आम्हाला अशी संतती मिळो की, ज्यांच्या जन्मामुळे जगातील हजारो लोकांचे कल्याण होवो. त्यांच्यासाठी असणाऱ्या कल्याणकारी घटनाही तूच घडवून आणतेस.

श्रीमाताजी आम्हाला दीर्घायुषी अवश्य करा. परंतु आम्हा सर्व सहजयोग्यांच्या दृष्टीने, आमच्या आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत, आपल्या चरणकमलांचे आम्हाला अखंड स्मरण होणे, म्हणजेच खऱ्या अर्थाने दीर्घायुष्य मिळणे होय.

धनमग्निर्धनं वायुर्धनं सूर्यो धनं वसुः ।
धनमिन्द्रो बृहस्पतिर्वरुणं धनमस्तु मे ॥५॥

विवरण: अग्नी आपल्याला पावन करतो. शुद्ध करतो. अग्निरूपी धन आमच्या घरात असू दे. म्हणजे आमच्या घरात चांगल्या कामासाठी अग्नी पेटता राहू दे. जो अग्नी चांगल्या कार्यासाठी प्रज्वलित होतो, तो अग्नी म्हणजे धन होय. अग्निदेवतेमुळे आमच्यातील द्वेष, मत्सर, जळून भस्मसात होऊ दे.वायू आम्हाला शांती देवो. आम्हाला स्वच्छ मोकळी हवा मिळो. सूर्यनारायणाचे तेज आम्हाला प्राप्त होवो.

अष्टवसू म्हणजे आठ दिशांचे पालक. ते आमच्याकडे धनरूप म्हणून येऊ देत. याचा अर्थ प्रगतीचे मार्ग- आठ दिशांनी - स्वच्छ होऊ देत. अशा स्वच्छ मार्गाने येणारी संपत्ती, म्हणजे साक्षात लक्ष्मीमाताच असते. इंद्र म्हणजे शौर्य. कोणत्याही चांगल्या कामासाठी आम्हाला असे शौर्य प्राप्त होऊ दे.

देवगुरूरूपी धन आम्हाला प्राप्त होऊ दे. याचा अर्थ आमच्यातील दहा धर्म जागृत होऊदेत.म्हणजे विवेकरूपी धन प्राप्त होईल. वरुण म्हणजे पर्जन्यरूपी धन मिळू दे. तसेच स्फटिकासारख्या शुद्ध जलाप्रमाणे आमचे आचरण, व्यवहार असू देत.

श्रीमाताजींची कृपादृष्टी आम्हा सर्व लेकरांवर सदैव असल्यामुळे वरीलप्रमाणे अविनाशी ऐश्वर्याचा वर्षाव हा आम्हा सर्व सहजयोग्यांवर सतत होतच असतो.

वैनतेय सोमं पिब सोमं पिबतु वृत्रहा ।
सोमं धनस्य सोमिनो मह्यं ददातु सोमिनः ॥६॥

विवरण :-वैनतेय म्हणजेच गरुड. आईचे दर्शन ऋषींना झाल्यामुळे ते खूष झालेले आहेत. आनंदित झालेले ऋषी गरुडाला सोमरस देत आहेत. वृत्रहा म्हणजे इंद्र. म्हणजेच वृत्र राक्षस नष्ट करणारी शक्ती. म्हणजेच सर्व पार्श्ववर्ती देव. सोमरस म्हणजे जीवनाचे सर्वस्व. हा सोमरस अमृतासमानच असे. लक्ष्मीमातेच्या आजूबाजूला असणाऱ्या सर्वांना ऋषी सोमरस देऊन सांगत आहेत, तुम्हांवर जशी लक्ष्मीमाता प्रसन्न आहे, तशी ती आमच्यावरही प्रसन्न होवो आणि आम्हाला ते सुवर्णरूपी आध्यात्मिक ऐश्वर्य मिळो.(सोमचा दुसरा अर्थ सुवर्ण)

आपल्या सर्वांच्या दृष्टीने, परमचैतन्याची प्राप्ती म्हणजेच अमृतप्राशनाचा आनंद होय. जे मागणे लक्ष्मीमातेकडे ऋषिमुनी मागत आहेत त्याचाच उदंड वर्षाव श्रीमाताजी आपल्या सर्व सहजयोग्यांवर सततकरीत आहेत. खरंच आपण सर्व किती भाग्यवान आहोत !

न क्रोधो न च मात्सर्यं न लोभो नाशुभा मतिः ।
भवन्ति कृतपुण्यानां भक्तांनां श्रीसूक्तं जपेत् ॥७॥

विवरण :- श्रीसूक्त म्हणजे लक्ष्मीमातेचे म्हणजेच आदिशक्तीचे यर्थार्थ वर्णन आहे. जर आपण श्रद्धेने याचे स्मरण जरी केले तरी आपल्यातील क्रोध, मत्सर, लोभ, दुष्टबुद्धी हे आपले शत्रू मारले जातात.

क्रोधाने लक्ष्मीमाता निघून जाते. दुसऱ्याबद्दल मत्सर वाटणे, असूया वाटणे म्हणजे मन क्षुद्र असणे यातून मनाचे दारिद्रय दिसून येते. अशा ठिकाणी स्थैर्य कसे येणार? म्हणून आम्हाला क्रोध, मत्सर, लोभ, हाव नको. आमची मती म्हणजे बुद्धी अशुभ बनू नये. आमच्या मतीमध्ये दुसऱ्याला तुच्छ लेखण्याची वृत्ती न यावी.

श्रीसूक्ताचा अर्थ समजून त्याप्रमाणे आत्मपरीक्षण करून जर दैनंदिन जीवनामध्ये त्याचे उपयोजन करण्याचा प्रयत्न केला तर लक्ष्मीमातेची निश्चित कृपा होते. पण आत्मपरीक्षण करण्याची बुद्धी तरी कोण देणार? अर्थातच आदिशक्तिमाता. म्हणूनच आपण सर्व मिळून श्रीमाताजींच्या चरणी प्रार्थना करू या की तुम्हीच आम्हाला आत्मपरीक्षणाची शक्ती द्या.

सरसिजनिलये सरोजहस्ते । धवलतरांशुकगंधमाल्यशोभे ।
भगवति हरिवल्लभे मनोज्ञे । त्रिभुवनभूतिकरि प्रसीद मह्नम् ॥८॥

विवरण: ' सरसिज' म्हणजे कमळ ' निलय म्हणजे घर' तू कमलनिवासिनी आहेस. तुझ्या हातात कमळ आहे. तुझे वस्त्र अतिशय शुभ्र आहे. तुझ्या गळ्यातील सुगंधी फुलांची माळ तुला शोभत आहे. तू भगवान विष्णूंची पत्नी आहेस. तू आमचे मन जाणतेस. तू त्रिभुवनाला वैभवशाली करणारी आहेस. तू आम्हाला प्रसन्न हो.

कमळ चिखलातून वर येऊन सुद्धा कसे स्वच्छ व टवटवीत असते म्हणून ते स्थान लक्ष्मीमातेला आवडते. तिचे निवासस्थानच ते आहे. लक्ष्मीमाता- शुभ्रवस्त्र धारिणी- जिच्या कपड्यांवर अजिबात डाग नाहीत. ती निष्कलंका आहे, म्हणजे आपल्याला मिळणारी संपत्ती ही स्वच्छ- सरळ मार्गातून येणारी असावी. अवैध मार्गांनी नको. लक्ष्मीमाता ही आपल्या इच्छा जाणते. मन जाणते, व त्याप्रमाणे आपल्याला जितके कल्याणकारी असेल तितके ती देतेच. तेव्हा हे जगदीश्वरी, तू आम्हांला प्रसन्न हो.

लक्ष्मीमाता आपल्यावर प्रसन्न होण्यासाठी आपण देखील कमळासारखेच बनायला हवे. कारण या संसाररूपी सरोवरात त्या पापाच्या चिखलातून आदिशक्तीने म्हणजेच श्रीमाताजींनी आपल्याला कमळांप्रमाणेच निष्कलंकरीत्या बाहेर काढले आहे. वर आणले आहे. जर आपण कमळरूपी आहोत, तर या कमळाच्या आपल्या सर्व पाकळ्या खरंच कमळाप्रमाणेच स्वच्छ हव्यात. आपले आचरण कमळाप्रमाणे हवे.त्यासाठी आपण सर्वांनी आपले हृदयकमल स्वच्छ ठेवू या. तरच लक्ष्मीस्वरूपा श्रीमाताजींना आपल्या हृदयकमळात वास करायला आवडेल.

॥ जय श्रीमाताजी ॥ क्रमशः

# सर सी.पी.श्रीवास्तवसाहेब, भाषण

ताऊदेवीलाल स्टेडियम, दिल्ली, दिनांक १९ आक्टोबर, २००१

मला आज येथे बोलण्याची संधी मिळाली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. येथे येण्यापूर्वी मी श्रीमाताजींची परवानगी मागितली आणि त्यांनी ती आनंदाने दिली. त्यांनी आपल्या सर्वांसाठी परवानगीबरोबरच त्यांचे प्रेम आणि आशीर्वादही पाठविले आहेत. श्रीमाताजींनी आपल्यासाठी असाही निरोप पाठविला आहे की, त्या जरी आज येथे प्रत्यक्ष येऊ शकल्या नाहीत, तरी उद्या सायंकाळी त्या येथे येणार आहेत.

परमेश्वराने त्यांच्या रूपात अवतार घेतला आहे; आणि मानवी रूपात अवतार घेतल्याने काही अडचणी येणे अपरिहार्य आहे. त्यांच्या प्रकृतीची अगदी योग्य पद्धतीने काळजी घेतली जात आहे, असे मी आपणास निश्चितपणे सांगतो. त्यांच्या प्रकृतीची तपासणी भारत, यु.के., इटली, अमेरिका इत्यादी जगातील उत्तम डॉक्टरांनी केली असून काही सहजयोगी डॉक्टर त्यांच्या तब्येतीची देखभाल अखंड २४ तास करीत असून दोन वर्षांपूर्वीपेक्षा आज त्यांची प्रकृती पुष्कळ चांगली आहे हे सांगण्यास मला आनंद वाटत आहे.

गेल्या वर्षी त्यांनी ठरविले होते की, आता हे काम तुम्हा मुलांवर म्हणजे सर्व सहजयोग्यांवर सोपवावे. कारण गेली ३०-३५ वर्षे त्या जगभर विमानाने, रेल्वेने, बसने प्रवास करून सहजयोग प्रसाराचे अविरत कार्य करीत आहेत. आता ८० व्या वर्षी ह्या कार्याची जबाबदारी त्यांच्या मुलांनी म्हणजेच सर्व सहजयोग्यांनी स्वीकारावी. श्रीमाताजी एके ठिकाणी बसून सर्व सहजयोग्यांना स्फूर्ती आणि प्रेरणा देण्याचे काम करतील. सर्व सहजयोग्यांनी हे कुणा एकट्याचे काम न समजता ते सामूहिक जबाबदारीने करावे. या निमित्ताने मी सर्वांपुढे विनंती प्रस्ताव ठेवू इच्छितो आणि माझी खात्री आहे की तुम्ही माझ्या मताशी सहमत व्हाल.

सहजयोगाच्या एकमेव निर्मात्या श्रीमाताजी श्रीनिर्मलादेवी असून त्याचे नेतृत्वही केवळ त्यांचेकडेच असेल.आपण सहजयोगी याच्याशी सहमत असाल तर असा संदेश जगभर प्रसारित व्हावा की श्रीमाताजी याच साकार अथवा निराकार रूपात एकमेव नेत्या असतील. आपणा सर्व सहजयोग्यांचे कर्तव्य आणि जबाबदारी आहे की श्रीमाताजींनी जेथे जेथे आणि जे जे संदेश दिले असतील ते ते सर्व व्हिडिओ/ऑडिओ कॅसेटमध्ये सुरक्षितरीत्या जतन करून ठेवायला हवेत.

श्रीमाताजींच्या इच्छेनुसार सहजयोगाचे कार्य सामूहिक जबाबदारीने होण्यासाठी त्यांनी 'वर्ल्ड कौन्सिल' ची स्थापना केली असून वैयक्तिक नेतृत्वाच्या जागी सामूहिक नेतृत्वाची उभारणी केली आहे. मला सांगण्यास आनंद होत आहे की या माध्यमातून सहजयोग्यांचे काम अतिशय चांगल्या पद्धतीने चालू आहे. भारतामध्ये एक ट्रस्ट निर्माण करण्यात आला असून त्याचे कामही सुरू झाले आहे. मला सांगण्यास आनंद होत आहे की श्रीमाताजींचे छिंदवाडा येथील जन्मस्थान असलेले घर या ट्रस्टने घेतले असून ते जगभरातील सर्वसहजयोग्यांचे सदैव स्फूर्तिस्थान ठरेल. या स्थानाजीकच ट्रस्टतर्फे आणखी जमीन घेतली असून तेथे आणखी इमारत बांधली जाणार आहे. तेथे भारतातून तसेच जगभरातून येणाऱ्या सहजयोग्यांसाठी राहण्याची व्यवस्था केली जाणार आहे. अशा तऱ्हेने जगभरातील सर्व सहजयोग्यांसाठी श्रीमाताजींचे हे एक पवित्र तीर्थक्षेत्र ठरेल.

श्रीमाताजींच्या या कार्याचा प्रसार प्रत्येकाने वैयक्तिक तसेच सामूहिक स्तरावर करावा. श्रीमाताजींनी प्रवचन देण्याचे थांबवण्यापूर्वी, कबेला येथे केलेल्या प्रवचनामध्ये प्रामुख्याने दोन गोष्टी सांगितल्या. त्यातून त्यांनी सर्वांसाठी दोन अतिशय चांगले संदेशच दिले आहेत.

# नवरात्री पुजा २००५












# कमानी ॲडोटेरियम, न्यु दिल्ली, दिनांक ३ ऑक्टोबर २००५












# राष्ट्रपती भवन, दिनांक १ ऑक्टोबर २००५













# दिवाळी धनत्रयोदशी पुजा २००५, प्रतिष्ठान, पुणे





# रक्षाबंधन २००५









पहिली गोष्ट म्हणजे सर्व सहजयोगी किंवा सहजयोगिनी एकच आहेत. कुणीही कुणापेक्षाही श्रेष्ठ-कनिष्ठ (लहान-मोठे)नाही. सर्वजण समान स्तरावर आहेत. सर्वजण अभेद आहेत. दुसरी गोष्ट म्हणजे प्रत्येक सहजयोग्याने दुसऱ्या सहजयोग्यावर मनापासून प्रेम करावे. आई आपल्या मुलावर जितके उत्कट प्रेम करते, ते जितके शुद्ध असते, त्यापेक्षाही ते उत्कट असावे. सहजयोगामध्ये भाषा, जाती, धर्माचा किंवा कसलाही भेदभाव नाही. सर्वजण एकच आहेत. श्रीमाताजींचे हे संदेश सर्व सहजयोग्यांनी कायम लक्षात ठेवावेत आणि त्याचा स्वत: अनुभव घेऊन दुसऱ्यांनाही तो द्यावा. खरच हा किती सुंदर अनुभव आहे! सर्वांनी हा संदेश हृदयात साठवून तो आचरणात आणावा.

मी परत एकदा सर्वांचे आभार मानतो. आपल्याला आश्वासन देतो की श्रीमाताजी स्वत:ची काळजी घेत आहेतच परंतु मी स्वत: व आमचे सहकारी त्यांची योग्य ती काळजी घेत आहेत. माझे वय आता ८५ चे पुढे आहे व मी वृद्ध झालो आहे. तरी सुद्धा माझे आता एकच काम आहे ते म्हणजे श्रीमाताजींची काळजी घेणे. पुन्हा एकदा आभार.

## श्रीमाताजींचे भारत आगमन

भारतातील पवित्र भूमीवर प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींचे आगमन रविवार दिनांक २५ सप्टेंबर २००५ रोजी सकाळी ८.३० वा. दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतराष्ट्रिय हवाई अडड्यावर झाले. त्यावेळी त्यांच्या सोबत श्री पापाजी होते. त्यावेळी दिल्लीचे वातावरण सहजयोगाला साजेसे असे प्रसन्न झाले. सर्वत्र चैतन्य जाणवू लागले. थंड हवेच्या प्रसन्न वातावरणात ट्रस्टच्या सर्व ट्रस्टींनी त्यांचे अत्यंत जोरदार स्वागत केले. प्रसन्न चित्त आनंदी श्रीमाताजींचा चेहरा पाहून साऱ्या उपस्थित सहजयोग्यांचे मन आनंदी व प्रफुल्लित झाले.

## श्रीमाताजींचे पुणे आगमन

### दिनांक २१ आक्टोबर २००५

आदिशक्ती प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींचे पालमविहार, गुडगांव निवासस्थानातून दिनांक २० ऑक्टोबर २००५ रोजी प्रस्थान झाले. त्या दिल्लीहून रात्री ११.३० च्या विमानाने निघाल्या मुंबईत त्यांचे विमानतळावर आगमन रात्री १.३० वा . झाले. त्यावेळी त्यांच्यासोबत ती.पापाजी, साधनादीदी होत्या. त्यांचे विमानतळावर स्वागत ट्रस्टी तसेच मुंबई, पुणे व नाशिकच्या काही सहजयोग्यांनी केले. त्यानंतर श्रीमाताजी लगेचच २.३० च्या सुमारास पुणे प्रतिष्ठान निवासस्थानाकडे निघाल्या.

दिनांक २१ आक्टोबर २००५ रोजी पहाटे ५.४५ वा त्या प्रतिष्ठान निवासस्थानात पोहचल्या. त्यावेळी पुणे प्रतिष्ठानच्या इमारतीवर विद्युतरोषणाई केली होती. सर्वत्र रांगोळ्या काढण्यात आलेल्या होत्या. श्रीमाताजींच्या चरणकमलांचा प्रतिष्ठानच्या वास्तूला स्पर्श झाल्याबरोबरच संपूर्ण वातावरणात आल्हाददायक गारवा जाणवू लागला. सर्वत्र प्रसन्नता जाणवू लागली. श्रीमाताजींच्या प्रतिष्ठानमधील दालनात जाण्याच्या मार्गावर सर्वत्र दिवे लावले होते. सर्वत्र फुलांच्या आकर्षक परड्या ठेवण्यात आल्या होत्या.

श्रीमाताजी आपल्या आरामकक्षात पोहोचल्यावर त्यांना खास महाराष्ट्रीय पद्धतीची हिरवी नऊवारी साडी नेसलेल्या सुवासिनीने ओवाळले. त्यानंतर त्यांच्या चरणावर सर्व जगातील सहजयोग्यांच्यावतीने पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर त्यांची दृष्ट काढण्यात आली. ती.पापाजींचे स्वागत बुके देऊन करण्यात आले. त्यावेळी सकाळचे साधारण ७.०० वाजले होते.

# श्रीकृष्ण पूजा, न्यू जर्सी-अमेरिका

२६-२७-२८ ऑगस्ट २००५

## वृत्तांत

श्रीकृष्ण -पूजा उत्सव न्यू-जर्सी येथें दि. २६ ते २८ या तीन दिवसांत उत्साहानें साजरा झाला. स्थानिक व जगभरांतून आलेले साधारण १००० सहजयोगी उपस्थित होते. एकमेकांची हार्दिक भेट झाल्याचा आनंद सर्वांच्या चेहऱ्यावरून उसळत होता व एकमेकांना भेटी देऊन तो व्यक्त होत होता. युवा-शक्तीने पराकाष्ठेची मेहनत घेऊन सर्व व्यवस्था चोख ठेवली होती.

उत्सवाची सुरूवात शुक्र. २६ रोजी संध्याकाळच्या संगीत रजनीने झाली. सुरूवातीच्या कु.श्रद्धा जोशी या चार वर्षाच्या बालिकेने वन्दे-मातरम् या मंत्र-वाणीने केली आणि सर्वांना चकित केले. त्यानंतर शाश्वति चुपुडे या बालिकेने एक गीत (Colours of the Wind) सादर केले.त्यानंतर दहीहंडीचा कार्यक्रम झाला, त्यांत युवा-शक्तीच्या मनोऱ्यावर उभे राहून श्रीकृष्णाचा पेहराव केलेल्या मुलानें दहीहंडी फोडल्यावर सर्वजण आनंदात नाचूं लागले.

दिवसभरांत एकमेकांबरोबर गप्पा-टप्पांत रमलेले योगी दुसऱ्या दिवशी, शनिवारी ता. २७ संध्याकाळी हॉटेलच्या नृत्यदालनामध्ये जमले. त्यावेळीं श्रीमाताजींच्या निवासस्थानी, त्यांच्या उपस्थितीत चाललेल्या संगीतसंध्येचे थेट (Live) प्रक्षेपण दूर-दर्शनावर सर्वांसाठी दाखविण्यात आले; तो समारंभ वेब-साईटच्या साहाय्यानें जगभरांत दूर -दूरच्या ठिकाणीही प्रक्षेपित करण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. हा कार्यक्रम सुमारे तासभर चालला. त्याच दिवशी नवीन वधु-वरांची नांवे जाहीर झाली व विवाह विधी आनंदात संपन्न झाल.

रविवार ता. २८ ऑगस्ट हा पूजेचा दिवस. संध्याकाळी लवकरच सर्व सहजयोगी पूजास्थानी जमले. सुरूवातीच्या भजनांमध्ये - ' नमामी श्रीगणराज दयाल', ' हे निर्मल माँ' , ' Sitting in the Heart of the Universe', ' हे आदि माँ हे अंति माँ', 'Oh Eternal Mother' या भजनांनंतर ' 'जोगवा' ' चालू असतानाच रात्री १० च्या सुमारास श्रीमाताजीचे आगमन झाले व ' 'स्वागत आगत स्वागतम् ' ' या भजनानें त्यांचे स्वागत झाले. प्रथम श्री गणेशपूजा व नंतर देवीपूजा झाल्यावर श्रीकृष्ण-स्वरूपाची पूजा करण्यांत आली. त्यावेळी ' कृष्ण गोविंद' हे भजन सर्वजण म्हणूं लागले. शेवटीं आरती व तीन महामंत्रांनी पूजा संपन्न झाली. थोडा वेळ 'वृंदावनी वेणू' , 'Amazing Grace', ' हे गोविंदा हे गोपाला' , ही भजने व भेट वस्तू अर्पण झाल्यानंतर सुमारे ११-४० वा. श्रीमाताजी निवासस्थानाकडे परतल्या. त्यावेळेस सर्व सहजयोगी पूर्ण शांतता राखून आदराने स्तब्ध उभे होते. पूजेचे अलौकिक समाधान सर्वांच्या चेहऱ्यावर विलसत होते.

(नू जर्सी हून इ-मेल द्वारा)

# राष्ट्रपती भवन नवी दिल्ली, वृत्तांत

दिनांक १ आक्टोबर २००५

सर सी. पी.श्रीवास्तव साहेबांना भारताचे राष्ट्रपती श्री ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या हस्ते लाल बहादूर शास्त्री नॅशनल अॅवार्ड फॅार एक्सलन्स इन पब्लिक अॅडमिनिस्ट्रेशन अॅकडमिक आणि मॅनेजमेंट २००४ प्रदान करण्याचा कार्यक्रम १ ऑक्टोबर २००५ रोजी संध्याकाळी ४.३० वा राष्ट्रपती भवन नवी दिल्ली येथे संपन्न झाला. सदर कार्यक्रमास आदिशक्ती प.पू. श्रीमाताजी निर्मलादेवी व त्यांचा परिवार तसेच भारताचे पंतप्रधान श्री मनमोहन सिंग, कॅांग्रेस पक्षाच्या नेत्यां श्रीमती सोनिया गांधी, श्री बलराम जाखड, तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यावेळी पापाजी सर सी.पी.श्रीवास्तव साहेबांनी राष्ट्रपतींसमोर भाषण केले त्याचा अनुवाद स्वतंत्र दिलेला आहे. त्यानंतर दिनांक ३ आक्टोबर २००५ रोजी लाल बहादूर शास्त्री ट्रस्ट तर्फे दिल्लीतील कमानी ऑडिटोरीयम या हॅालमध्ये सर सी.पी.श्रीवास्तव साहेबांच्या सत्काराचा कार्यक्रम आयोजित केलेला होता. सदर कार्यक्रमास प.पू. श्रीमाताजी निर्मलादेवी उपस्थित होत्या. त्याच्यासोबत त्यांचा परिवार व अनेक ट्रस्ट्री उपस्थित होते.

## लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय पारितोषिक: स्वीकृति भाषण

### सी. पी. श्रीवास्तव (आय. ए. एस. (निवृत्त)

राष्ट्रपती भवन - दि. १ ऑक्टोबर २००५

भारताचे सर्वश्रेष्ठ आदरणीय राष्ट्रपति डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम
भारताचे अद्धितीय सन्माननीय पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग
यु. पी. ए. च्या चेअरपर्सन श्रीमती सोनिया गांधी

सन्माननीय मंत्रिगण,
युवर एक्सलंसीज्
ख्यातकीर्त पाहुणे,
सज्जन स्त्रीपुरुषहो,

लाल बहादूर शास्त्रींच्याप्रमाणे द्रष्टे आणि संपूर्ण जगात नीतिमत्ता, सचोटी आणि सदाचरण यांच्यासाठी विख्यात असणारे राष्ट्रपती यांनी या विख्यात सभेपुढे लालबहादूर शास्त्री राष्ट्रीय पारितोषिक मला प्रदान करण्याच्या महनीय प्रसंगी मी परमादराने आणि शाश्वत कृतज्ञतेने नम्रतापूर्वक त्यांना अभिवादन करीत आहे. माझ्या संपूर्ण सार्वजनिक सेवाकालात माझ्यासाठी हा सर्वश्रेष्ठ क्षण आहे.

हे पारितोषिक निर्माण केल्याबद्दल लाल बहादूर शास्त्री इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट संस्थेस आणि तिच्या बोर्ड ऑफ गव्हर्नरांस मी नम्र आदरभावना कृतज्ञतापूर्वक अर्पण करितो. मी या पारितोषिकास पात्र आहे असे ठरविल्याबद्दल मी सन्माननीय अध्यक्ष आणि परीक्षकमंडळाचा चिरऋणी आहे.

देशाच्या विविध भागात, सचिवालयात आणि मोठया सार्वजनिक उपक्रमात काम करण्याच्या संधी देऊन देशसेवा करण्याचे सौभाग्य मला लाभले. युनायटेड नेशन्स सिस्टीम या संस्थेची सेवा करण्याचा विशेषाधिकारही मला मिळाला.

या सर्व पदोन्नतीत लाल बहाद्दूर शास्त्री, पं. जवाहरलाल नेहरुंच्या शासनात वाहूतक आणि संदेशवहनमंत्री आणि नंतर वाणिज्य आणि उद्यममंत्री असतांना त्यांची सेवा करण्याची पदोन्नती ही सर्वात श्रेष्ठ संधी होती. आणि पुढे हिंदुस्थानचे पंतप्रधान झाल्यावर त्यांची सेवा करण्याचा बहुमान मला मिळाला हा तर सुसंधीचा कळसच होता. या दोन्ही पदी मी त्यांना व्यक्तिगत निजसचिव आणि समुपदेशक होतो.

शास्त्री यांच्या संबंधात जुनी म्हण 'कार्यरत असणे म्हणजेच ईश्वरोपासना ' अगदी तंतोतंत खरी होती. एखाद्या कार्याच्या संदर्भात भिन्नभिन्न दृष्टिकोन नम्रतापूर्वक समजावून घेणे आणि मतभिन्नता संपविणे हे ते करीत. शाश्वत मूल्यांच्यावर आधारित ते निर्णय घेत. त्यांच्यासमवेत काम करणाऱ्यांना हीच तत्त्वे पाळावी लागत. प्रामाणिक मतभिन्नता ते उत्तमप्रकारे समजून घेत.

ताश्कंद येथे आयुष्याच्या अंतिम दिनापर्यंत मी त्यांच्या समवेत होतो. त्यांच्या अकाली मृत्यूने हिंदुस्थानास जबर धक्का बसला.

माझ्यावर सोपविलेल्या कामांत( ती हिंदुस्थानात करावयाची असोत वा बाहेर करावयाची असोत.)त्यांची तत्त्वे अगदी लक्षपूर्वक पाळण्याचा मी प्रयत्न करीत असे. अध्यक्ष आणि व्यवस्थापक म्हणून माझी नियुक्ती झालेल्या शिपिंग कार्पोरेशन ऑफ इंडिया या संस्थेत सर्व कर्मचारी जणू काही एकाच कुटुंबाचे घटक याप्रमाणे एकनिष्ठतेने वागत. कोणत्याहीअनिष्ट प्रसंगाचे एकही उदाहरण घडले नाही की भांडणतंट्यामुळे एकही तास फुकट गेला नाही। जेव्हा शिपिंग कार्पोरेशन ऑफ इंडिया दहा लाख टन मालाची वाहतूक करणारी पहिली हिंदुस्थानी संस्था बनली त्यावेळी तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी शिपिंग कार्पोरेशन ऑफ इंडिया या संस्थेची स्तुती 'शिपिंग कॅार्पोरेशन ऑफ इंडियाच्या कार्य करण्याच्या प्रणालीमुळें भारतीय जनतेस सार्वजनिक विभागाच्या कार्याची कल्पना आधिकाधिक मान्य होऊ लागली आहे ' या शब्दात केली.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या आंतरराष्ट्रीय सागरी संस्थेच्या विकसनशील किंवा विकसित सदस्य राष्ट्रांनी मला पूर्ण आधार दिला. आधार देणाऱ्या राष्ट्रात चीन आणि पाकिस्तान यांचा समावेश होता. या दोन्ही राष्ट्रांनी मला राजकिय स्तरावर भेटण्याचे निमंत्रण दिले.

या संस्थेच्या चार सत्रांत एकूण १६ वर्षे केलेल्या सेवेत मी शास्त्रींच्या भिन्न दृष्टिकोनांचा समन्वय साधण्याचा दृढ निश्चय करणे आणि सर्वमान्य तोडगा काढणे या तत्त्वांचे अनुसरण करण्याचा प्रयत्न केला. याचा परिणाम म्हणजे सर्व व्यवस्थापन निर्णय आणि धोरणे आवश्यक त्या चर्चेनंतर सहकाऱ्यांच्या एकमतावर अधिष्ठित अशा एकमताने ठरविली गेली. जागतिक पातळीवर हा एक अत्यंत उदात्त अनुभव होता.

या सर्वच गोष्टींचे श्रेय मी श्री लाल बहाद्दूर शास्त्री यांना देतो.

सरते शेवटी, माझी पत्नी निर्मला हिचे, आमच्या विवाहाची ५८ वर्षे मला मिळालेले प्रोत्साहन आणि या प्रोत्साहनाचे प्रचंड ऋण आणि आमच्या कन्या कल्पना आणि साधना यांनी आमच्यावर केलेली प्रेमळ देखरेख हेही ऋण मान्य करण्याची अनुज्ञा आपणाकडे मागतो. या ऋणांमुळेतर मी ८५ वर्षे तुमच्यापुढे उभा आहे.

गेली ३५ वर्षे माझ्या सौभाग्यवती निर्मला ह्या अथकपणे, सर्व धर्मांच्या एकात्मतेवर आधारित असे नवसमाजनिर्मितीचे कार्य करीत आहेत. शास्त्रीजी ज्या नैतिक आणि सुसंस्कृत मूल्यांवर ठामपणे उभे राहिले, त्या मुल्यांवर आधिष्ठित असेच कार्य त्या करीत आहेत. तेव्हां आता उर्वरित आयुष्य त्यांच्याबरोबर हे कार्य करण्यासाठीच मी वाहून घेणार आहे.

शेवटी पुन्हा एकदा, हिंदुस्थानचे सन्माननीय अध्यक्ष श्री कलाम यांचे चिरऋण मान्य करुन आणि येथे असलेल्या सर्व श्रेष्ठींचे आभार मानून मी माझे भाषण संपवतो. ● ● ●

# आदिशक्ति महाभैरवी विरचित
# ॥ श्री कुण्डलिनीस्तुतिस्तोत्र ॥

कुंडलिनीस्तुतिस्तोत्र 'रुद्रयामल-उत्तरतंत्र' या प्राचीन ग्रंथाच्या सहाव्या पटलामध्ये आहे. जेव्हा श्रीभैरवदेवांनी सामरस्यासाठी श्रीदेवीकडे साधनाची मागणी केली, तेव्हां स्वत: श्रीमहाभैरवीदेवीने प्रथम पशुभाव व नंतर सुषुम्नासाधन कथन केले असून त्यामध्येच हे कुंडलिनीस्तुतिस्तोत्र तिने श्रीमहाभैरवांना सांगितले आहे.

सुषुम्नासाधन :- साधकाने मूलाधाराच्या ठिकाणी तेज:पुंज अशा कुंडलिनी महादेवीचे स्मरण करावे. ही शक्ती स्वत:च्या तेजाने त्रैलोक्याला व्यापणारी अर्थात प्रकाशित करणारी आहे. ती अखंड महान आनंदात असणारी अशी आहे. ही उत्साह वाढविणारी, कोट्यावधी विजांप्रमाणे तेजस्वी कांती असणारी व कोटी चंद्राप्रमाणे शीतल अशी आहे. ही शक्ती मूलाधारात साडेतीन वेढे घालून बसलेली, महातेजस्वी व तप्त सुवर्णाप्रमाणे असून योग साध्य करुन देणारी असून सहस्रारात गमन करणारी अशी आहे. ती कोटीकोटी सूर्यकिरणांप्रमाणे तेज व प्रकाश धारण करणारी व कुलमोहिनी आहे. ही महाशक्ती सर्व त्रैलोक्याचे रक्षण करते. साधकाला महाबुद्धी प्रदान करते. ती अत्यंत सूक्ष्ममार्गात तेजोरुपाने वावरणारी असून ही सर्वरूपी असून सर्व ठिकाणी व्यापलेली व अतिशय चैतन्यमयी आहे. हे भैरवनाथा, तिचे स्तुतिस्तोत्र आता आपण श्रवण करावे.

## सार्थ श्रीकुण्डलिनीस्तुतिस्तोत्र

जन्मोद्धार निरीक्षणीहतरुणी वेदादिबीजादिमा
नित्यं चेतसि भाव्यते भुवि कदा सद्वाक्यसञ्चारिणी ।
मां पातु प्रियदासभावकपदं सङ्घातये श्रीधरे ।
धात्रि ! त्वं स्वयमादिदेववनिता दीनातिदीनं पशुम् ॥१॥

अर्थ : (कुलकुण्डलिनी महादेवी) ही जन्म (आणि मृत्यू) यांच्या चक्रात अडकून पडून त्यातच सतत फिरत राहणाऱ्या आपल्या भक्तांचा कोणत्या प्रकाराने उद्धार करावा व त्यांना मुक्तीची प्राप्ती कशी करुन द्यावी (यासाठी उत्तम वेळेची) प्रतीक्षा करीत राहते. ही महाशक्ती तरुण अर्थात् नित्यनूतन आहे. ती वेदांची व अन्य सकल शास्त्रांची म्हणजे शब्दब्रह्माची आदिकारणभूत शक्ती असून बीजाक्षरांची जननी आहे. या संसारात योगिसाधक आपल्या चित्तामध्ये या महान् शक्तीच्या जागृतीचा बोध प्राप्त करुन घेतात. ही महाशक्ती नेहमीच सत्य बोलणारी किंवा सत्य भाषणाकडे प्रवृत्त करणारी आहे. ही कुण्डलिनी महादेवी स्वत: आदिनाथ महादेवाची पत्नी आहे. अशा प्रकारच्या हे शुभंकरी माते ! संसारबंधनात अडकलेला मी एक दीनातिदीन पशू अर्थात् जीव असून तू माझे

रक्षण कर. एवढेच नव्हे तर मी तुझ्याबरोबर दिव्य ऐक्य प्राप्त करीन आणि स्वत: तुझा अत्यंत प्रिय असा सेवक होईन अशी तू माझ्यावर कृपा कर.

रक्ताभामृतचन्द्रिका लिपिमयी सर्पाकृतिर्निद्रिता
जाग्रत्कूर्म्मसमाश्रिता भगवती त्वं मां समालोकय।
मांसोद्गन्धकुगन्धदोषजडितं वेदादिकार्यान्वितं
स्वल्पस्वामलचन्द्रकोटीकिरणैर्नित्यं शरीरं कुरु ॥२॥

अर्थ - या कुलकुण्डलिनी महाशक्तीची कांती रक्ताप्रमाणे लाल रंगाची आहे. ही दिव्यशक्ती चन्द्राप्रमाणे अत्यंत शीतल आहे. या शक्तीचे शरीर लिपिमय म्हणजे मातृका अर्थात् अक्षर स्वरुपयुक्त आहे. म्हणजे ही शक्ती वर्णाच्या, अक्षरांच्या किंवा शब्दांच्या द्वारा आपले अव्यक्त स्वरूप व्यक्त करते. या शक्तीची आकृती सर्पाप्रमाणे असून ती सर्पाप्रमाणेच निद्रिस्त अवस्थेत असते. हे भगवती देवी ! तू जागेपणी अर्थात जागृत होऊन कूर्मदृष्टीचा अवलंब करुन माझ्याकडे कृपा दृष्टीने पाहा. अपार व निर्मल अशा कोट्यावधी चंद्रांच्या किरणांप्रमाणे उज्ज्वलकांती असलेल्या हे कुण्डलिनी माते ! मांसाच्या उग्रसंधाने व तर शारीरिक दुर्गंधीने दूषित झालेले हे माझे शरीर वेदादि (परमेश्वरी) कार्याला अनुकूल आणि योग्य असे कर.

सिद्धार्थी निजदोषवित्स्थलनगतिर्व्याजीयते विद्यया
कुण्डल्या कुलमार्गमुक्तनगरीमायाकुमार्गःश्रिया।
यद्येवं भजति प्रभातसमये मध्यान्हकालेऽथवा
नित्यं यः कुलकुण्डलीजपपद्माम्भोजं स सिद्धो भवेत् ॥३॥

अर्थ - शुद्ध इच्छा असणारा, आपले स्वत:चे दोष माहीत असणारा आणि शरीरातील स्थलांचे (महत्त्वाच्या चक्रांच्या स्थानांचे) आणि त्यांच्या वैशिष्टयांचे ज्ञान असणारा साधक या भूतलावर श्री कुण्डलिनी विद्या संपादन करुन विजयी होऊ शकतो. त्याचप्रमाणे तो मायेच्या खोट्या व फसव्या मार्गापासून स्वत:ची सुटका करुन घेऊन कुण्डलिनी विद्येच्या बळावर सर्व व्यवहार करीत कुलमार्गासारख्या अनोळखी मार्गाचा आश्रय करुन त्याच्या द्वारा मुक्तीच्या नगरात पोहोचतो. अशा प्रकारे जो साधक दररोज प्रात:काळी व मध्यान्हकाळी या कुण्डलिनीच्या चरणांचा नियमाने म्हणजे दीर्घकाल, निरंतर व श्रद्धा-भक्ति-सत्कार-भावपूर्वक आश्रय घेईल तो सिद्ध होईल.

वाय्वाकाशचतुर्दलेऽतिविमले वाञ्छाफलोन्मूलके
नित्यं सम्प्रति नित्यदेहघटिता साङ्केतिता भाविता।
विद्या कुण्डलमानिनी स्वजननी माया क्रिया भाव्यते
यैस्तैः सिद्धकुलोद्भवैः प्रणतिभिः सत्स्तोत्रकैः शम्भुभिः ॥४॥

अर्थ - ही कुलकुण्डलिनी महाशक्ती आकाशरूप म्हणजे शब्द तत्त्वरूप आणि वायुरूप म्हणजे स्पर्शतत्त्वरूप अर्थात् अनुभूतिस्वरुप असलेल्या चार पाकळ्यांच्या कमळाच्या वर म्हणजे मूलाधारात राहून देहाचा व्यवहार चालविते. तिचेच ध्यान योगिसाधक नेहमी करीत असतो. ही शक्ती अत्यन्त निर्मल किंवा पवित्र अशी असून ती सांसारिक कामनांच्या फलप्राप्तीची वासना किंवा इच्छा मुळापासून नाहीशी करणारी आहे. ही कुण्डलिनी शक्ति नित्य (अविनाशी) असून ती सांकेतिक तत्त्वांची किंवा स्वरूपाची (ॐ कार स्वरुप) सर्पाकार व साडेतीन वेढे घालून बसलेली आहे, अशी योगिसाधकांची सत्य धारणा आहे. जे साधक श्रीकुण्डलिनीविद्या ही ज्ञानरुपिणी असून आपली आई आहे. अशा भावनेने पाहतात व ही महाशक्ती म्हणजेच माया शक्ति व क्रियाशक्ति आहे, हे लक्षात घेऊन तिचे अनुसरण करतात अर्थात् सर्वभावनेने तिला शरण जाऊन साधन करतात. अशा साधकांचा सिद्धांकडून आदर होतो.

वाताशङ्कविमोहिनीति बलवच्छायापटोद्गामिनी
संसारादिमहासुखप्रहरणी । तत्र स्थिता योगिनी।

सर्वग्रन्थिविभेदिनी स्वभुजगा सूक्ष्मातिसूक्ष्मा परा
ब्रह्मज्ञानविनोदिनी कुलकुटीराघातनी भाव्यते ॥५ ॥

अर्थ - मी श्रेष्ठ अशा कुण्डलिनी देवीची साधना करताना ती तीव्रातितीव्र स्वरूपात जागृत होऊन सदाशिवस्वरूप व्हावी म्हणून तिचा मोठा आदर करुन तिच्याविषयी चिन्तन इत्यादि करतो. ती शरीरात उत्पन्न होणाऱ्या वातादि सर्व दोषांना निवृत्त करणारी आणि घोर अशा अज्ञानरूपी पडद्याला फाडून वर जाणारी आहे. ती विशेष करुन संसारादि महासुखाच्या ज्या ज्या म्हणून कल्पना आहेत त्या त्या सर्व कल्पना तोडून-मोडून छिन्नभिन्न करणारी व त्यांना हाणून पाडण्यासाठी कटिबद्ध झालेली योगिनी आहे. ती ब्रह्मग्रंथी, विष्णुग्रंथी, रुद्रग्रंथी इत्यादि सर्व ग्रंथींचा भेद करणारी आहे. (ही कुण्डलिनी महाशक्ती) सूक्ष्माहूनही अत्यन्त सूक्ष्म रूपाची म्हणजे वाणी, मन इत्यादि कोणत्याही इंद्रियांना न दिसणारी व त्यांच्या आटोक्यात न येणारी अशी आहे. ती अत्यंत महान व श्रेष्ठ असून ब्रह्मज्ञानाचा सहज लाभ करून देणारी आहे. (ही कुण्डलिनी महामाया) कुलमार्गरूपी झोपडीला (स्वत:च्याच शक्तीने उत्पन्न केलेल्या त्रैलोक्याला) नष्ट करणारी, जगदाभासाला मावळून टाकणारी आहे.

वन्दे श्रीकुलकुण्डली त्रिवलिभि: साङ्गै: स्वयम्भूप्रियां
प्रावेष्ट्याम्बरचित्तमध्यचपला बालाबलानिष्कलां ।
या देवी परिभाति वेदवदना सम्भावनी तापिनी
इष्टांना शिरसि स्वयम्भुवनिता सम्भावयामि क्रियाम् ॥६ ॥

अर्थात - मी साडे तीन वेढ्यांनी युक्त आणि परमेश्वराच्या अत्यंत आवडत्या असलेल्या अशा कुलकुण्डलिनी देवीला, वंदन करतो. (ही महाशक्ती कुण्डलिनी) मनोरुप आकाशात म्हणजे सहस्त्रारात विजेसारखी चपल असणारी, तरळणारी व चमचमाट करणारी अशी आहे. ती तरुण, बलवती म्हणजे सद्गुरुकृपेने जागृत झाल्यावर आपल्या बळाच्या जोरावर विश्वाला आत्मसात करणारी आणि कलारहित म्हणजे अंशहीन आहे. (ही महाशक्ती दिव्य प्रकाशाने युक्त किंवा महाप्रकाशमान असून वेदवदना म्हणजे ज्ञानमुखी अर्थात् ज्ञानाचे साक्षात मुख असणारी किंवा जिच्यापासून पर-अपर विद्यांचे म्हणजे सकल भौतिक व पारमार्थिक विद्यांचे ज्ञान होते अशी आहे.) तीच देहाला प्रथम आपल्या अग्निस्वरूपाने किंवा सूर्यस्वरूपाने तप्त करणारी व मागाहून आपल्या चंद्रस्वरूपाने किंवा अमृतस्त्रावाने शांत करणारी आहे. आपल्या अभीष्ट गोष्टी साधण्यासाठी तिची मी अत्यंत श्रेष्ठ म्हणून संभावना करतो.)

वाणीकोटिमृङ्गनादमदना निश्रेणिकोटिध्वनि:
प्राणेशी प्रियताममूलकमनोल्लासैकपूर्णानना ।
आषाढोद्भवमेघराजिजनितध्वान्ताननास्थायिनी
माता सा परिपातु सूक्ष्मपथगे । मां योगिनां शङ्करी ॥७ ॥

अर्थ - ही कुण्डलिनी महाशक्ती अनन्त मातृकारूप वाणीने युक्त आहे अर्थात अ पासून ज्ञ पर्यंत जेवढ्या मातृका आहेत त्यांच्या सम्मीलनाने ती आपल्या अव्यक्त स्वरुपापासून व्यक्त स्वरुपाप्रत आली आहे. ज्यावेळी ही महाशक्ति सुषुम्नागामी होऊन मृदंग, भेरी, वीणा इत्यादि दशविध नादात परिणत होऊन साधकाच्या ठिकाणी उपस्थित होते, त्यावेळी साधक निरतिशय आनंदात बुडून जातो. अर्थात् ही शक्ती चैतन्ययुक्त, आहे. ही प्राणांची स्वामिनी आहे. अर्थात् हीच प्राणांची अधिष्ठात्री देवता आहे. या शक्तीचे मुख निश्चल मनाच्या उल्हासाने पूर्णपणे भरलेले आहे. ही महाशक्ती कुण्डलिनी आषाढातील मेघसमुदायाच्या काळ्याकुट्ट मुखात विजेप्रमाणे राहणारी व दिव्य प्रकाशमान अशी आहे. ह शक्ती योगिजनांचे कल्याण करणारी अर्थात् तिला शरण गेलेल्या सर्व साधकांना इष्ट देऊन पालन करणारी व अनिष्ट दूर करून रक्षण करणारी आहे. ही कुलकुण्डलिनी महाशक्ती सूक्ष्ममार्गात म्हणजे सुषुम्नामार्गात गमन करणारी अर्थात् या मार्गाने जीवरूप साधकाला गुरुरूपाने मार्गदर्शन करीत व त्याचा हात आपल्या हातात घेऊन सहस्त्रारात सदाशिवाशी समरस होण्यासाठी जाणारी आहे. (अशा प्रकारचे वैशिष्टय किंवा सामर्थ्य असणारी) ती कुण्डलिनी माता माझे रक्षण करो.

त्वामाश्रित्य नरा व्रजन्ति सहसा वैकुण्ठकैलासयो-
रानन्दैविलासिनीं शशिशतानन्दाननां कारणम्।
मात: श्रीकुलकुण्डलिनी प्रियकले । काली कलोद्दीपने।
तत्स्थानं प्रणमामि भद्रवनिते । मामुद्धर त्वं पथे ॥८॥

अर्थ - हे कुलकुण्डलिनी देवी । तुला पूर्णपणे शरणागत होऊन जे साधक महायोगाचे साधन करतात ते साधकयोगी वैकुण्ठ-कैलासादि निरनिराळ्या नावांनी निर्दिष्ट होणाऱ्या सहस्त्रार नावाच्या एकाच ठिकाणी त्वरित गतीने व सहज जाऊन पोहोचतात. हे देवी । तू अखण्ड आनन्दातच सतत विलास करणारी आहेस. तू सर्व कारणांचे कारण आहेस अर्थात् तू सर्वांचे आदि कारण आहेत. तुझे मुखकमल शेकडोशे चन्द्राप्रमाणे अत्यन्त आल्हाददायक असे आहे. अर्थात् शेकडोशे चन्द्राच्या तेजाप्रमाणे तुझ्या मुखावर प्रसन्नता पसरलेली दिसते. हे कुलकुण्डलिनी, (हे प्रियकले, हे काली, अर्थात् भीतिप्रदे, हे कलोद्दोपन म्हणजे सकल कला उद्भूत करणाऱ्या माते, हे कल्याणकारिणी माते, मी तुझ्या स्थानाला म्हणजे मूलाधाराला वन्दन करतो. तुझ्या मार्गाने तू मला घेऊन जाऊन माझा उद्धार कर...

कुण्डलीशक्तिमार्गस्थं स्तोत्राष्टकमहाफलम्।
य: पठेत् प्रातरुत्थाय स योगी भवति ध्रुवम् ॥९॥

अर्थ - कुण्डलिनी शक्तिमार्गातील जे साधक आहेत त्यांना हे आठ श्लोकांचे स्तोत्र महान् असे फल देणारे आहे. जो कोणी प्रात:काळी याचे पठन करील तो योगी होतोच हे निश्चित समजावे.

क्षणादेव ही पाठेन कविनाथो भवेदिह।
पवित्रौ कुण्डलि योगी ब्रह्मलीनो भवेन्महान् ॥१०॥

अर्थ - या स्तोत्राच्या पाठाने साधक क्षणमात्रात महाकवी होतो. या कुण्डलिनीशक्ती मार्गाचा अभ्यास करणारा म्हणजे दीर्घकाल, निरंतर व मोठ्या श्रद्धाभक्तिपूर्वक आदराने साधन करणारा योगी पवित्र व महान् होतो आणि अशा साधकाला ब्रह्म जाणणाऱ्या सिद्धांमध्ये महत्त्वाचे स्थान मिळते.

इति ते कथितं नाथ। कुण्डलिकोमलं स्तवम् ॥११॥

अर्थ - हे नाथ, सहजयोगाच्या साधका ! हे कोमल कुण्डलिनीस्तुतिस्तोत्र मी म्हणजे महाभैरवीने, अर्थात् सिद्धयोग प्रवर्तक आदिनाथ शंकराशी अभिन्न असलेल्या महामाया आदिशक्तीने तुला सांगितले आहे.

एतत्स्तोत्रप्रसादेन देवेषु गुरुगीष्पति: ।
सर्वे देवा: सिद्धियुता: अस्या: स्तो त्रप्रसादत: ॥१२॥
द्विपरार्धं चिरंजीवी ब्रह्मा सर्वसुरेश्वर: ॥१३॥

अर्थ - या स्तोत्राच्या प्रसादाने बृहस्पती हा देवांचा गुरू झाला या कोमल कुण्डलिनी स्तोत्राच्या कृपाप्रसादाने सर्व देव सिद्धिसंपन्न झाले आणि देवाधिदेव ब्रह्मदेव हा दोन परार्ध आयुष्य प्राप्त होऊन चिरंजीव झाला.

● ● ●

---

तरी न्यून ते पुरते । अधिक ते सरते ॥
करुनी घेयावे हे तुमते। विनवितु असे ॥

# गणेश पुजा २००५







# नवरात्री पुजा २००५ - म्युझिक प्रोग्राम





